औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार दि. १२. १०. ९३ रोजी झालेल्या ८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-= ==-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१] श्री. ईश्वर भोसीकर — सभापती औरंगाबाद मंडळ

२] श्री. भास्कर मुंढे — उपसभापती औरंगाबाद मंडळ

३] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरू चारठाणकर — सदस्य औरंगाबाद मंडळ.

४] श्री. देशपांडे, नगररचनाकार [उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद विभाग यांचे सदस्य प्रतिनिधी] — सदस्य प्रतिनिधी.

५] श्री. गायकवाड शहर अभियंता [म. न. पा. औ"बाद] आयुक्त म. न. पा. औरंगाबाद. यांचे सदस्य प्रतिनिधी — सदस्य प्रतिनिधी.

विषय क्र. १: भूकंपग्रस्तांना श्रध्दांजली अर्पण करणेबाबत.

ठराव क्र. ५१३ — दिनांक १२. १०. ९३

दिनांक ३०. ९. १९९३ रोजी झालेल्या भूकंपाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे मराठवाड्यातील उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यामध्ये झालेल्या वित्त हानी व मनुष्यहानीबद्दल मंडळाने दु:ख व्यक्त केले व मृतात्म्यास श्रध्दांजली अर्पण केली.

विषय क्र. २: दिनांक २८. ९. ९३ रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५१४ — दिनांक १२. १०. ९३

औरंगाबाद मंडळाच्या दिनांक २८. ९. ९३ रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. ३: सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात योजनेसाठी तरतुद कमी असतांना जास्तीचा खर्च करण्यास मंजूरी मिळणेबाबत.

---

या बाबतीत मा. मुख्याधिकारी यांनी मंडळापुढे सादर केलेली बाब टिप्पणी वाचुन दाखविली. बाब टिप्पणीमध्ये नमुद केलेल्या काही योजनेवर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा थोडासा जास्त खर्च झालेला आहे असे नमुद केले. विशिष्ट परिस्थितीमध्ये अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा कमी किंवा जास्त खर्च होऊ शकतो व तो माहे डिसेंबरमध्ये होणाऱ्या सुधारीत अंदाजपत्रकात समायोजीत केला जातो. जास्त झालेला खर्च पुढील सुधारीत अंदाजपत्रकात समायोजीत करण्यांत येईल असे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले.

यावर सांगोपांग चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५१५ | दिनांक १२.१०.९३

सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात मंडळाच्या विविध योजनासाठी तरतुद कमी असतांना जास्तीचा खर्च करण्यास मंडळ मान्यता देत आहे. याबाबत सुधारीत अंदाजपत्रकात योग्य ती तरतुद करावी.

विषय क्र. ४: आर-२७ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ८८ गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

.....

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, ८८ गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निम्नतम दराची निविदा ही २५.७८६% जादाची होती. निम्नतम दराचे निविदाधारक मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रतिनिधी याच्यासोबत मंडळाच्या ८६ व्या बैठकीत चर्चा झाली व त्यांनी २४% टक्केपर्यन्त अधिकदराने काम करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु या दराने काम देण्यास मंडळाची तयारी नसल्याचे त्यांना सांगण्यांत आले. मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनीयांचे प्रतिनिधीनी पुन्हा २१.३५% अधिक या दराने काम करण्यास तयार असल्याचे मंडळास लेखी पत्र दिले. त्यानुसार हा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्याचा निर्णय दि. २८.९.९३ रोजी घेतला होता असे उपसभापतींनी सांगितले.

यावर चर्चा करतांना मुख्याधिकारी यांनी सांगितले की, तांत्रिक शाखेने तपासणी केली असता निम्नतम निविदा धारकाने सुधारीत ऑफर मध्ये दिलेला दर सन १९९२-९३ च्या दर सुचीप्रमाणे इस्टीमेटेड रेट पेक्षा १.६८%जास्त येतो असे दिसुन आले आहे. निविदा ही सन १९९१-९२ चे दर सुचीवर [डीएसआर]आधारीत काढलेली आहे. सन १९९२-९३ चे दरसुचीप्रमाणे इस्टीमेटेडकॉस्टवर येण्यासाठी निविदेतील रकमेच्या १९.३५% जादा दर येतो असा खुलासा कार्यकारी अभियंता यांनी केला.

इस्टीमेटेड कॉस्टवर म्हणजेच निविदेतील रकमेच्या १९.३५% जादा दराने काम देणे इष्ट होईल असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

या विषयावर मंडळाने सांगोपांग चर्चा झाली. सन १९९३-९४ चा डी.एस.आर. माहे ऑक्टो. १९९३ मध्ये लागु होतो. तो झालाही असेल. त्यामध्ये पुन्हा कांही टक्के वाढ होईल हे अनुभवावरुन म्हणता येईल. निम्नतम निविदाधारकाने दिलेल्या दरावर निविदा स्विकारली नाही व फेर निविदा काढली तर पुन्हा सुधारीत १९९३-९४ चे दरसुचीवर आधारीत निविदा येतील व **पुन्हा** जास्तीचा बोजा मंडळावर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच वेळ व काळ याचा अपव्यय होऊन मंडळाचे नुकसान होईल असे मा. सभापतींनी सांगितले त्यावर इतर सदस्यांनी सहमती दर्शविली व खालील प्रमाणे निर्णय घेणेत आला.

ठराव क्र. ५१६          दिनांक १२.१०.९३

आर-२७ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गट ८८ गाळ्यांचे बांधकाम निविदेतील रककमेच्या [१९९१-९२ ]२१.३५% जादा दराने निम्नतम दराचे निविदाधारक शमा कन्स्ट्रक्शन कंपनीस देण्यांत यावे.

निविदाधारकाचे दराची वैधता दि ३१.१०.९३ पर्यन्तच असल्यामुळे हा ठराव पुढील बैठकीत कायम करण्याची वाट न बघता आताच कायम झाला असे समजुन कामाचे आदेश [वर्क ऑर्डर] लगेच देणेत यावेत.

विषय क्र. ५: आर-२६ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६८ गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना मा. उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, मंडळाच्या ८६ व्या बैठकीत उपरोक्त कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा मंडळाच्या निर्णयास्तव ठेवल्या होत्या व निम्नतम दराचे ठेकेदार मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांनी निविदेत दिलेला २५.००% जादा हा दर कमी करण्याबाबत त्यांच्याशी वाटाघाटी केल्या परंतु सदर ठेकेदार फक्त १.२५% कमी करण्यास तयार झाले व ते यापेक्षा दर कमी करण्यास तयार नसल्याने मंडळाने त्यांना ६८ गाळ्याचे बांधकाम देण्याबाबत असमर्थता दर्शविली. यावर चर्चा चालु असतांना मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांचे प्रतिनिधीनी विचाराअंती २१.३५% जादा या दराने काम करण्याची तयारी दर्शविली व त्याप्रमाणे मंडळास लेखी पत्र दिले. त्यामुळे मंडळाच्या ८६ व्या बैठकीत हा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत निर्णयासाठी ठेवावा असे ठरले होते. त्यामुळे हा विषय या बैठकीत ठेवण्यात आला आहे असे उपसभापतींनी सांगितले.

मा. उपसभापतींनी सांगितले की, मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांनी कमी करून दिलेला दर हा ९१-९२ च्या सी. एस. आर वर २१.३५% जादा येतो व ९२-९३ च्या सी. एस. आर वर हा दर १.४६% जादा येतो असे तांत्रिक शाखेच्या तपासणीअंती दिसुन येते.

निविदा ही सन १९९१-९२ चे दरसुचीवर आधारीत आहे. सन १९९२-९३ चे दरसुचीप्रमाणे इस्टीमेटेड रेटला यायचे असेल तर निविदेतील दराच्या १९.६०%जास्त यावे लागेल अशी माहिती कार्यकारी अभियंता यांनी दिली. त्यावर इस्टीमेटेड रेट प्रमाणे काम देणे म्हणजेच निविदेतील रकमेच्या १९.६०% जास्त दराने देणे इष्ट होईल. असा खुलासा उपसभापतींनी केला.

या विषयावर सांगोपांग चर्चा झाली. निम्नतम ठेकेदाराने नमुद केलेला दर हा तांत्रिक शाखेच्या तपासणीअंती १९९२-९३ ची दर सुची ग्राह्य धरून इस्टीमेटेड कॉस्टच्या १.४६% जादा येतो. सन १९९३-९४ ची दरसुची माहे ऑक्टो. १९९३ मध्ये सार्वजनिक बांधकाम खाते लागु करते.

ती सुधारीत झालेली असेल. त्यामध्ये मागील अनुभव पहाता निश्चित वाढ होईल असे वाटते. फेर निविदा काढली तर निविदाधारक सन १९९३-९४ चे दरसुचीचा आधार घेऊन जास्तीचा दराच्या निविदा भरतील ही शक्यता नाकारता येत नाही. फेर निविदा काढल्यास वेळचा अपव्यय ही होईल व किंमती वाढण्याची शक्यता आहे.

वरील सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करुन हे काम निम्नतम दराचे निविदाधारक मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांना देण्यास हरकत नसावी असे मा. सभापतींनी सांगितले. यावर इतर सदस्यांनी सहमती दर्शविली व खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

ठराव क्र. ५१७ दिनांक १२. १०. ९३

आर २६ येथील ९८ मध्यम उत्पन्न गट गाळ्याचे बांधकाम निविदेतील दराच्या २१. ३५% जादा दराने निम्नतम दराचे निविदा धारक मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांना देण्यांत यावे.

निविदाधारकाचे दराची वैधता ही ३१. १०. ९३ पर्यन्तच असल्यामुळे हा ठराव पुढील बैठकीत कायम करण्याचा वाट न ं, बघता आताच कायम झाला असे समजुन कामाचे आदेश [वर्क ऑर्डर] लगेच देण्यांत यावेत.

विषय क्र. ६: आर-४३ सिडको औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत ५० गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

हा विषय चर्चेस आला असता मंडळाच्या सदस्यांना मा. उपसभापतींनी माहिती दिली की, ५० गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा या मंडळाच्या ८६ व्या बैठकीत निर्णयासाठी ठेवल्या होत्या. परंतु निम्नतम दराची प्राप्त झालेली निविदा ही २५. ६१% जास्त दराची असल्याने मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांच्याशी वाटाघाटी करण्यासाठी त्यांच्याशी चर्चा केली व त्यांनी फक्त १. ११% कमी करण्याची तयारी दर्शविली. म्हणजे २४. ५०% जादा दराने काम करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु सदरचा दर जास्त वाटत असल्याने

मंडळाने या दराने काम देण्यास नकार दिला. शेवटी मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांनी विचाराअंती २१.३५% या दराने काम करण्याची तयारी दर्शविली व तसे पत्र मंडळाकडे सादर केले. त्यामुळे मंडळाच्या ८६ व्या बैठकीत असे ठरले की, हा विषय मंडळाच्या ८७ व्या बैठकीत निर्णयासाठी ठेवावा. त्यानुसार हा विषय आजच्या बैठकीत चर्चेसाठी व निर्णयासाठी सादर केला असल्याचे मा. उपसभापतींनी सांगितले.

मा. उपसभापतींनी मंडळास सांगितले की, मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांनी कमी करून दिलेला दर हा ९१-९२ च्या सी. एस. आर वर २१.३५% जास्त येतो व ९२-९३ च्या सी. एस. आर वर हा २.८७ टक्के जास्त येतो असे तांत्रिक व लेखा शाखेच्या तपासणीअंती दिसुन येते. निविदा ही सन ९१-९२ च्या दरसुचीवर आधारीत काढलेली आहे. सन ९२-९३ च्या दरसुचीप्रमाणे इस्टीमेटेड रेटवर येण्यासाठी निविदेतील रकमेवर १७.९६% जादा दर येतो असा खुलासा कार्यकारी अभियंता यांनी केला.

सन १९९२-९३ च्या दरसुचीवर आधारीत इस्टीमेट रेटने काम देणे म्हणजेच निविदेमधील रकमेच्या १७.९६% जादा दराने काम देणे इष्ट होईल असा खुलासा मा. उपसभापतींनी केला.

या विषयावर सांगोपांग चर्चा झाली. निम्नतम दरधारकास काम न देता जर फेर निविदा काढल्या तर त्यास विलंब लागेल तसेच सन १९९३-९४ ची सुधारीत दर सुची ही ऑक्टोंबर महीण्यात लागु होते. . . .ही दरसुची लागु झाल्यास मागील अनुभव पहाता किमान ५% तरी दरसुचीमधील वाढतात असे वाटते.

नविन निविदा काढल्यास १९९३-९४ चे दर सुचीवर आधारीत निविदा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुन्हा आणखी किंमत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता निम्नतम दर निविदाधारकास काम देण्यास हरकत नाही असे मा. सभापतींनी प्रतिपादन केले. त्यावर इतर सदस्यांनी सहमती दर्शविली व खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्र. ५१८ — दिनांक १२. १०. ९३

आर ४३ सिडको औरंगाबाद येथील : ; उच्च उत्पन्न गट ५० गाळ्यांचे बांधकाम निम्नतम दर निविदाधारक मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांना निविदेतील रकमेच्या २१.३५% जादा दराने देणेत यावे.

निविदाधारकाचे दराची वैधता ही ३१. १०. ९३ पर्यन्तच असल्यामुळे

हा ठराव पुढील बैठकीत कायम करण्याची वाट न बघता आताच कायम झाला असे समजुन कामाचे आदेश [वर्क आर्डर ] लगेच देण्यांत यावेत.

विषय क्र.७: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या परिपुर्ती करणेबाबत.

.....

या विषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. व्यकंटराव देशपांडे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, श्री. तुळणकर यांच्या पत्नीचा आजार, शासनाने निर्गमीत केलेल्या जी. आर. मधील कोणत्या आजारात मोडतो व त्याचा क्रमांक काय ?

यावर मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, सर्व माहितीसह हा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५१९ दिनांक १२.१०.९३

श्री. तुळणकर यांच्या पत्नीचा आजार शासनाने निर्दिष्ट केलेल्या कोणत्या आजारात येतो व त्यासंबंधीच्या सविस्तर माहितीसह हा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा.

विषय क्र.८: हर्सूल औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गट या योजनेतील शिल्लक गाळ्यांचे वाटपाबाबत प्रथम येईल त्यास प्रथम गाळा देण्याबाबत.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२० दिनांक १२.१०.९३

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास [मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल] विनियम १९८१ च्या विनियम १४ अनुसार प्रथम अर्ज भरून पुर्तता करेल त्यास प्रथम गाळा वाटप करणे या तत्वावर औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना नियमानुसार रक्कम घेऊन गाळा वाटप करावा.

विषय क्र.९: मा.सभापतीच्या परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय.

विषय क्र.१: गट क्र.१०४/१ तिसगांव जि.औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गटांतर्गत ५४० गाळे व मध्यम उत्पन्न गटांतर्गत १४६/१५४ गाळ्यांची योजना.

या विषयावर चर्चा करतांना मा.उपसभापतींनी मंडळास सांगितले की, फार मोठ्या रकमेच्या निविदा काढल्या असता वर्ग-३ च्या वर नोंदणीकृत ठेकेदार निविदा भरतो. करिता मागील अनुभव पाहता वर्ग-३ चे नोंदणीकृत ठेकेदार कमी आहे व त्यामुळे खा-या स्पर्धात्मक निविदा येत नाहीत. स्पर्धा निकोप राहाव्यात हा दृष्टीकोन ठेऊन ५० लाखाच्या वरच्या निविदा विभागल्या तर वर्ग-३ च्या नोंदणीकृत ठेकेदारा व्यतिरिक्त लहान ठेकेदारांना निविदा भरता येतील. परिणामी प्रचलित असणारा खारा दर निविदामध्ये येईल व निकोप स्पर्धा टिकून राहील हा उद्देश समोर ठेऊन गट क्र.१०४/१ तिसगांव जि.औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गटातील ५४० गाळे व मध्यम उत्पन्न गटातील १५४ गाळ्यांच्या योजनेचा विभाजनाचा प्रस्ताव ठेवलेला आहे व तो मा.उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविला. यास सर्व मंडळाच्या सदस्यांनी सम्मती दर्शविली.

या विषयावर सांगोपांग चर्चा झाली व चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेतला.

ठराव क्र.५२१ दिनांक १२.१०.९३

५४० गाळे अल्प उत्पन्न गट, गाळ्यांचे विभागजन खालील प्रमाणे करण्याचे ठरले.

| भाग | गाळ्यांची संख्या | बांधकामाची किंमत [रूपये] | झाडे लावण्याची किंमत [रूपये] | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|
| भाग-१ | १६६ | ४०१०७२६/- | १५१५०/- | ४०२५८६७/- |
| भाग-२ | १८३ | ४४२१४६३/- | १७७००/- | ४४३९१६३/- |
| भाग-३ | १९१ | ४६१४७५१/- | ६१५०/- | ४६२०९०१/- |
| एकुण | ५४० | १३०४६९४०/- | ३९०००/- | १३०८५९४०/- |

[ब] १४६/१५४ गाळे मध्यम उत्पन्न गट गाळ्यांचे खालील प्रमाणे विभाजन करण्याचे ठरले.

| भाग | गाळ्यांची संख्या | बांधकामाची किंमत रुपये | झाडे लावण्याची किंमत [रुपये] | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| भाग-१ | ६६ | २६७२०४३/- | ९ १५०/- | २६८११९३/- |
| भाग-२ | ८० | ३२३८८४०/- | १८९००/- | ३२५७७४०/- |
| एकुण | १४६ | ५९१०८८३/- | २८०५०/- | ५९३८९३३/- |

या प्रमाणे निविदा मागविण्यांत याव्यात असे सर्वानुमते ठरले.

.....

विषय क्र. २: दै. लोकमत, दै. लोकपत्र व दै. देवगिरी तरुण भारत, मराठवाडा, यांना व्यापारी दर देणेबाबत त्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करणेबाबत.

या विषयाच्या सर्व पार्श्वभूमी मंडळाच्या सदस्यांना उपसभापतींनी सांगितली व प्राधिकरणाचे जनसंपर्क अधिकारी यांचे पत्र क्र. जसंअ/प्रा. १८७२ दि. १९. ४. ९३ हे बैठकीत वाचून दाखविले. या पत्रातील आशय असा आहे की, जी वर्तमानपत्रे महाराष्ट्र शासनाच्या [डी. जी. आय. पी. आर] माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी मान्य केलेल्या दराप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करीत असतील अशा वर्तमानपत्रांना जाहिराती देण्यांत याव्यात. जी वर्तमानपत्रे शासन मान्य दराने जाहिराती स्विकारीत नसतील अशा वर्तमानपत्रांना अपवादात्मक व आवश्यक असेल तर जाहिराती पाठविण्यांत याव्यात.

यावर मंडळाच्या सदस्यांचे असे मत झाले की, मराठवाड्यातील जास्त खपणारे वर्तमानपत्र व सर्व लोकांपर्यन्त पोहोचणारे वर्तमानपत्रे म्हणजे, लोकमत, देवगिरी तरुण भारत, मराठवाडा, लोकपत्र ही आहेत. या वर्तमानपत्रात जाहिराती, निविदा प्रसिध्द केल्यास त्यास अधिक प्रसिध्दी मिळते असा आजपर्यन्तचा अनुभव असल्याचे सदस्यांनी प्रतिपादन केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२२ दिनांक १२. १०. ९३

दैनिक लोकमत, दैनिक देवगिरी तरूण भारत, दैनिक मराठवाडा, लोकपत्र यांनी मागितलेला वाणिज्य दरत्यांना देण्यांत यावा व निविदा तथा गाळ्यांच्या वाटपासंबंधीच्या तसेच इतर जाहिराती या सर्क्युलेशन प्रमाणे देण्यांत याव्यात.

विषय क्र. ३: श्री. एस. एस. चंदनशिवे, सेवानिवृत्त चौकीदार यांच्या रोखून ठेवण्यांत आलेल्या ५०% उपदानांच्या रक्कमेबाबत.

....

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, या मंडळातील सेवानिवृत्त चौकीदार श्री. एस. एस. चंदनशिवे यांनी रोशनगेट औरंगाबाद या वसाहतीतील मोकळ्या जागेवर अनधिकृतरित्या राहत असल्यामुळे व सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांनी सदरहु जागेचा ताबा मंडळास परत केला नाही म्हणून उपदानाच्या रक्कमेची ५०% रक्कम रोखून ठेवण्यांत आली आहे.

श्री. चंदनशिवे यांनी दि. १२. १०. ९३ रोजी लेखी विनंती अर्ज केला आहे की, सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे काही दिवसासाठी त्यांना तेथे राहून देण्यांत यावे. ज्यावेळेस मंडळास माझी जागा हवी असेल त्यावेळेस मी माझे घर पाडून जागेचा ताबा मंडळास परत करण्यास तयार आहे. परंतु माझी ५०% रोखून ठेवलेली उपदानाची रक्कम मला अदा करावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२३ दिनांक १२. १०. ९३

श्री. चंदनशिवे यांनी मंडळास केलेल्या विनंतीनुसार, पावसाळ्याचे दिवस संपण्यापर्यन्त त्यांना रोशनगेट येथील

अनाधिकृत बांधलेल्या घरात राहू द्यावे व मंडळास ज्यावेळेस जागेची आवश्यकता असेल त्यावेळी घर पाडून जागेचा ताबा घेण्यांत यावा. परंतु त्यांची उपदानाची रोखून ठेवलेली ५०% रक्कम त्यांना लगेच अदा करण्यांत यावी.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून सभा संपली.

.............................